सन २०१७-१८ मध्ये केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वीत कार्यक्रमांसाठी आदिवासी जनजाती क्षेत्र उपयोजने (TSP) अंतर्गत केंद्र हिश्श्यापोटी रू.३१९२.०० लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-०३१८/प्र.क्र.१०३/आ-७

१० वा मजला , गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

वाचा :-

१) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२०१७-३३/२०१७-NHM-F/२, दिनांक २९ डिसेंबर, २०१७.
२) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२०१७-३३/२०१७-NHM-F/३, दिनांक २९ डिसेंबर, २०१७.
३) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२०१७-३३/२०१७-NHM-F/४, दिनांक २९ डिसेंबर, २०१७.
४) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२०१७/३८/२०१७-NHM-F/४, दिनांक ३० डिसेंबर, २०१७.
५) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२०१७/३८/२०१७-NHM-F/३, दिनांक ३० डिसेंबर, २०१७.
६) भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे क्र. G.२०१७/३८/२०१७-NHM-F/२, दिनांक ३० डिसेंबर, २०१७.
७) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. राआसोम/एफएमजी/कें.रा.हि./१०७१६-२०४/२०१७-१८, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ चे पत्र.
८) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.बीयुडी-२०१६/प्र.क्र.०५/कार्यासन-६, दिनांक ३१ मार्च, २०१८.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्रपुरस्कृत योजनांसाठी केंद्र शासनाने उपरोक्त आदेशान्वये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमासाठी ६०% केंद्र

हिश्श्यापोटी आदिवासी उपयोजने (TSP) करिता सन २०१७-१८ साठी निधी वितरीत केल असून सदर अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

राज्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वीत असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत आदिवासी जनजाती क्षेत्र उपयोजने अंतर्गत (TSPI) लाभार्थ्यांकरिता सन २०१७-१८ साठी ६०% केंद्र हिश्श्यापोटी रु. ३१९२.०० लक्ष (रुपये एकतीस कोटी ब्याण्णव लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र.टी-५, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-०६- सार्वजनिक आरोग्य-७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, ०१-जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना (०१) (०४) राष्ट्रीय आरोग्य अभियान (केंद्र हिस्सा) २२१०F७३८, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत.

सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिपत देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरिल निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. सदरचे अनुदान सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१३/ प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ११२/अर्थोपाय, दिनांक १४ मार्च, २०१८ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११२३५४२१७१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.04.04 14:38:10 +05'30'

(अ. नि. साखरकर)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
८. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१३.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१४.निवडनस्ती (आरोग्य -७) .